# Punctuation. (विरामचिन्हे)

वाक्य वाचत असताना किंवा लिहिताना थोडे थांबावे लागते. थांबणे यालाच विराम असे म्हणतात. विराम दर्शविण्यासाठी लिखाण करताना आपण जि चिन्हे वापरतो, त्यांनाच विरामचिन्हे (Punctuation Marks) असे म्हणतात. परीक्षेमध्ये हा प्रश्न 2 मार्क साठी विचारला जातो.

1. Full Stop.(.) **पूर्णविराम:-** वाक्य पूर्ण झाले आहे हे समजण्यासाठी पूर्णविराम हे विरामचिन्ह वापरतात.पूर्णविराम हे चिन्ह विधान अर्थी व आज्ञार्थी वाक्याच्या शेवटी वापरतात.
2. Comma.(,) **स्वल्पविराम:-** वाक्य वाचत असताना थोड थांबण्यासाठी स्वल्पविराम वापरतात. यामुळे वाचनाराला अर्थ समजण्यासाठी मदत होते. तसेच स्वल्पविरामाचा उपयोग लिखाण करताना वेगवेगळ्या कारणाने केला जातो. तीन किंवा तीनपेक्षा अधिक शब्द लिहित असताना, Words, phrase, clauses, मुख्य उपवाक्याच्या कर्त्यानंतर, Reported Speech, सुरुवातीला असेल, तर त्यानंतर स्वल्पविराम देतात. Reporting Verb नंतर स्वल्पविराम देतात.
3. Question Mark. (?) **प्रश्नचिन्ह :-** प्रश्नार्थक वाक्याच्या शेवटी प्रश्नचिन्ह देतात.
4. Exclamation Mark.(!) **उद्गारचिन्ह:-** उद्गारवाचक वाक्याच्या शेवटी उद्गारचिन्ह देतात.
5. Quotation Mark / Inverted Commas [“…..”]or[‘…..’]. **अवतरणचिन्ह:-** बोलणाऱ्या व्यक्तींचे कथन अवतरणचिन्हां मध्ये लिहितात.
6. Apostrophe (’) षष्ठी विभक्ती स्पष्ट करण्यासाठी Apostrophe चा वापर करतात.

1) Capitalization. [‘A’] प्रत्येक वाक्याचे, काव्यपंक्तींचे, विशेषनामाचे आणि अवतरणचीन्हांतील पहिले अक्षर Capital Letter मध्ये लिहितात.

अभ्यासासाठी खाली काही उदाहरणे सोडवली आहेत.

**Punctuate the Following.**

1) she smiled a beggar changed my life

Ans: She smiled, “A beggar changed my life.”

2) swetha is a very beautiful girl isnt she

Ans: Swetha is a very beautiful girl, isn’t she?

3) dont raise such dust he called out to nathu

Ans: ‘Don’t raise such dust!’ he called out to Nathu.